# पिंपरी चिंचवड महानगरपालिका
## प्राथमिक शिक्षण विभाग
### जाहिरात क्रं. ३२५/२०२२

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे प्राथमिक शिक्षण विभागाच्या अस्थायी आस्थापनेवर गट 'क' संवर्गातील "सहाय्यक शिक्षक" व "पदवीधर शिक्षक" हि एकत्रित मानधनावर तात्पुरत्या स्वरुपात भरण्यासाठी पात्र उमेदवारकडून ऑफलाईन पद्धतीने अर्ज मागविणेत येत आहेत. या विषयाची सविस्तर जाहिरात पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या www.pcmcindia.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येणार आहे.

| अ.क्रं. | पदनाम | पदसंख्या |
|---|---|---|
| | **मराठी माध्यम पदे - २०४** | |
| १ | सहाय्यक शिक्षक (उपशिक्षक) | ११० |
| २ | पदवीधर शिक्षक ( विज्ञान विषय) | ८५ |
| ३ | पदवीधर शिक्षक ( भाषा विषय) | ०९ |
| | **उर्दू माध्यम पदे – ४६** | |
| १ | सहाय्यक शिक्षक (उपशिक्षक) | १८ |
| २ | पदवीधर शिक्षक ( विज्ञान विषय) | १८ |
| ३ | पदवीधर शिक्षक ( भाषा विषय) | ०४ |
| ४ | पदवीधर शिक्षक (समाजशास्त्र विषय) | ०६ |
| | **हिंदी माध्यम पदे – १५** | |
| १ | सहाय्यक शिक्षक (उपशिक्षक) | ०९ |
| २ | पदवीधर शिक्षक ( विज्ञान विषय) | ०३ |
| ३ | पदवीधर शिक्षक ( भाषा विषय) | ०१ |
| ४ | पदवीधर शिक्षक (समाजशास्त्र विषय) | ०२ |
| | **इंग्रजी माध्यम पदे – २०** | |
| १ | सहाय्यक शिक्षक (उपशिक्षक) | १० |
| २ | पदवीधर शिक्षक ( विज्ञान विषय) | ०४ |
| ३ | पदवीधर शिक्षक ( भाषा विषय) | ०४ |
| ४ | पदवीधर शिक्षक (समाजशास्त्र विषय) | ०२ |
| | **एकूण** | २८५ |

वरील पदाकरिता भरावयाच्या पदांची आरक्षण निहायं संख्या ( सामाजिक व समांतर आरक्षण) शैक्षणिक अर्हता,मानधन वेतन,अर्जाचा नमुना,अर्ज करण्याची मुदत, इतर आवश्यक अटी व शर्ती, सर्वसाधारण सूचना महानगरपालिकेच्या www.pcmcindia.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर आमच्याबद्दल (About) नोकरी विषयक (Recruitment) या मेनूमध्ये दिनांक- ~~२९~~ ३०/११/२०२२ पासून पाहण्यास उपलब्ध होतील.

(प्रदीप जांभळे- पाटील)
अतिरिक्त आयुक्त(१)
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-१८

क्रंमांक –शिक्षण/प्रा.शा/१अ/कावि/५७०/२०२२
दिनांक- २३/११/२०२२

# पिंपरी चिंचवड महानगरपालिका ,पिंपरी पुणे – १८

## प्राथमिक शिक्षण विभाग

## एकत्रित मानधनावर तात्पुरत्या स्वरुपात सहा.शिक्षक व पदवीधर शिक्षक नेमणुक करणेबाबत.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका प्राथमिक शिक्षण विभागामार्फत शैक्षणिक वर्ष – २०२२ -२०२३ केवळ या कालावधीसाठीच ऊर्दु , हिंदी व इंग्रजी माध्यमाच्या शाळांमध्ये पात्र उपशिक्षक/पदवीधर यांची एकत्रित मानधन तत्वावर ०६ महिने कालावधीसाठी (उन्हाळी सुटटी वगळून )तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती करणेसाठी दिनांक ०८/१२/२०२२ ते ०९/१२/२०२२ अखेर सकाळी १०.०० ते सांय ५.०० वा. पर्यंत समक्ष अर्ज मागविणेत येत आहेत.

➢ मराठी माध्यमातुन शिक्षण झालेल्या उमेदवारांकरिता आवश्यक पदे २०४

| अ.क्र. | पद | शैक्षणिक अर्हता | एकत्रित मानधन(प्रति.महा.) | आवश्यक पदे |
|---|---|---|---|---|
| १ | सहा. शिक्षक (उपशिक्षक) | एच.एस.सी - डी.एड, | २००००/- | ११० |
| १ | पदवीधर शिक्षक | एच.एस.सी- डी.एड -बी.एस.सी - बी.एड (विज्ञान विषय) | २००००/- | ८५ |
| २ | | एच.एस.सी - डी.एड बी.ए - बी.एड. (भाषा विषय) | २००००/- | ०९ |

### आरक्षणनिहाय पदांचा तपशील

| पद | अनु.जाती | अनु.जमाती | विजाअ | भजब-ब | भज-क | भज-ड | विमाप्र | इमाव | आ.दु.घ | खुला | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| उपशिक्षक | १४ | ०८ | ०३ | ०३ | ०४ | ०२ | ०२ | २१ | ११ | ४२ | ११० |
| पदवीधर | १२ | ०७ | ०३ | ०२ | ०३ | ०२ | ०२ | १८ | ०९ | ३६ | ९४ |

➢ उर्दु माध्यमातुन शिक्षण झालेल्या उमेदवारांकरिता आवश्यक पदे ४६

| अ.क्र. | पद | शैक्षणिक अर्हता | एकत्रित मानधन(प्रति.महा.) | आवश्यक पदे |
|---|---|---|---|---|
| १ | सहा. शिक्षक (उपशिक्षक) | एच.एस.सी - डी.एड, | २००००/- | १८ |
| १ | पदवीधर शिक्षक | एच.एस.सी- डी.एड -बी.एस.सी - बी.एड (विज्ञान विषय) | २००००/- | १८ |
| २ | | एच.एस.सी - डी.एड बी.ए - बी.एड. (भाषा विषय) | २००००/- | ०४ |
| ३ | | एच.एस.सी - डी.एड बी.ए - बी.एड. (समाजशास्त्र विषय ) | २००००/- | ०६ |

### आरक्षणनिहाय पदांचा तपशील

| पद | अनु.जाती | अनु.जमाती | विजाअ | भज-ब | भज-क | भज-ड | विमाप्र | इमाव | आ.दु.घ | खुला | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| उपशिक्षक | ०२ | ०१ | ०१ | ०१ | ०१ | ०० | ०० | ०३ | ०२ | ०७ | १८ |
| पदवीधर | ०३ | ०२ | ०१ | ०१ | ०१ | ०१ | ०० | ०५ | ०३ | ११ | २८ |

## ➢ हिंदी माध्यमातून शिक्षण झालेल्या उमेदवारांकरिता आवश्यक पदे १५

| अ.क्र. | पद | शैक्षणिक अर्हता | एकत्रित मानधन(प्रति.महा.) | आवश्यक पदे |
|---|---|---|---|---|
| १ | सहा. शिक्षक (उपशिक्षक) | एच.एस.सी - डी.एड, | २००००/- | ०९ |
| १ | पदवीधर शिक्षक | एच.एस.सी- डी.एड -बी.एस.सी - बी.एड (विज्ञान विषय) | २००००/- | ०३ |
| २ | | एच.एस.सी - डी.एड बी.ए - बी.एड. (भाषा विषय) | २००००/- | ०१ |
| ३ | | एच.एस.सी - डी.एड बी.ए - बी.एड. (समाजशास्त्र विषय ) | २००००/- | ०२ |

### आरक्षणनिहाय पदांचा तपशील

| पद | अनु.जाती | अनु.जमाती | विजाअ | भज-ब | भज-क | भज-ड | विमाप्र | इमाव | आ.दु.घ | खुला | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| उपशिक्षक | ०१ | ०१ | ०१ | ०० | ०० | ०० | ०० | ०२ | ०१ | ०३ | ०९ |
| पदवीधर | ०१ | ०० | ०१ | ०० | ०० | ०० | ०० | ०१ | ०१ | ०२ | ०६ |

## ➢ इंग्रजी माध्यमातून शिक्षण झालेल्या उमेदवारांकरिता आवश्यक पदे -२०

| अ.क्र. | पद | शैक्षणिक अर्हता | एकत्रित मानधन (प्रति.महा.) | आवश्यक पदे |
|---|---|---|---|---|
| १ | सहा. शिक्षक (उपशिक्षक) | एच.एस.सी - डी.एड, | २००००/- | १० |
| १ | पदवीधर शिक्षक | एच.एस.सी- डी.एड -बी.एस.सी - बी.एड (विज्ञान विषय) | २००००/- | ०४ |
| २ | | एच.एस.सी - डी.एड बी.ए - बी.एड. (भाषा विषय) | २००००/- | ०४ |
| ३ | | एच.एस.सी - डी.एड बी.ए - बी.एड. (समाजशास्त्र विषय ) | २००००/- | ०२ |

### आरक्षणनिहाय पदांचा तपशील

| पद | अनु.जाती | अनु.जमाती | विजाअ | भज-ब | भज-क | भज-ड | विमाप्र | इमाव | आ.दु.घ | खुला | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| उपशिक्षक | ०१ | ०१ | ०१ | ०० | ०० | ०० | ०० | ०२ | ०१ | ०४ | १० |
| पदवीधर | ०१ | ०१ | ०१ | ०० | ०० | ०० | ०० | ०२ | ०१ | ०४ | १० |

**अटी व शर्ती पुढील प्रमाणे आहेत.**

१) एकत्रित मानधनावर नेमलेल्या शिक्षकांची नेमणुक ही आदेशाचे दि.पासुन उन्हाळी सुटटी वगळून०६ महिने कालावधीसाठी तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती असेल.आवश्यकतेनुसार ही मुदत दिलेल्या कालावधीपुर्वी केव्हाही संपुष्टात आणण्याचे मा.अति.आयुक्त(१)सो.पिं.चिं.मनपा यांचा राहील.त्यानंतर सदरचा कालावधी कोणतीही

पुर्वसुचना न देता आपोआप संपुष्टात येईल. त्यामुळे अर्जदारास कोणत्याही कायमपदी नेमणुकीचा हक्क प्राप्त राहणार नाही. तसेच नेमणुकी संदर्भात न्यायालयात दाद मागणार नाही. तसेच नियुक्तीच्या वेळी सदरच्या नेमणूकीबाबतचे हमीपत्र सादर करावे लागेल.

२) उमेदवाराने आपल्या अर्जासोबत शाळा सोडल्याचा दाखला, धारण केलेली शैक्षणिक व व्यवसायीक अर्हताविषयक प्रमाणपत्र, पदवीका, डी.एड., बी.एड. पदवी प्रमाणपत्र व गुणपत्रक , अनुभव प्रमाणपत्र, तसेच इतर आवश्यक प्रमाणपत्र व कागदपत्राच्या सत्य प्रती सादर करणे बंधनकारक आहे.

३) ज्या दिवशी प्राथमिक शिक्षण विभागास सदर सहा.शिक्षकांची आवश्यकता नसेल त्यावेळी कोणत्याही नोटीशी शिवाय सदर उमेदवारांची सेवा संपृष्टात आणण्यात येईल. या संबधीचे सर्व अधिकार मा. अतिरिक्त आयुक्त-१ पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने राखुन ठेवले आहेत. तसेच पात्र उमेदवारांना नेमणुक देताना शिक्षक संख्या कमी – जास्त करण्याचा अधिकार मा. अति.आयुक्त(१) सो.पिं.चिं.मनपा यांचा राहील.

४) उमेदवाराने सोबत दिलेल्या नमुन्यात सहा.शिक्षक व पदवीधर शिक्षक या पदासाठी अर्ज मा.अति.आयुक्त(१), पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांच्या नावाने करावा. सदरचा अर्ज **दि. ०८/१२/२०२२ ते ०९/१२/२०२२ रोजी सकाळी १० ते सायंकाळी ०५.०० वाजेपर्यत समक्ष जुना 'ड' प्रभाग कार्यालय, कर्मवीर भा. पाटील मनपा प्राथ. शाळा, पिंपरीगाव,** येथे वेळेत सादर करावा.

५) निवड झालेल्या उमेदवारास एकत्रित मानधना व्यतिरीक्त मनपा मार्फत देण्यात येणाऱ्या कोणत्याही सोयी सुविधा हक्क व इतर आर्थीक लाभ व भत्ते देय राहणार नाहीत. (उदा.दिवाळी बोनस तथा सानुग्रह अनुदान)

६) अर्जदाराने अर्ज केला अथवा विहित अर्हता धारण केली म्हणजे नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला असे नाही. निवड प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर तसेच नियुक्ती झाल्यानंतरही अर्जदार विहित अर्ज / पात्रता धारण न करणारा, गैरवर्तन करताना दबाव तंत्राचा वापर करताना आढळल्यास संबंधिताची उमेदवारी अथवा निवड रद्द करणेत येईल, तसेच काही आक्षेप आढळल्यास कोणतीही पुर्व सुचना न देता त्याची नियुक्ती समाप्त करणेत येईल.

७) विहीत मुदत काळात प्राप्त न झालेल्या अर्जाचा विचार कोणत्याही परस्थितीत करणेत येणार नाही.

८) अर्जदाराने आपले अर्ज महापालिकेच्या जाहीरातीमध्ये विहित केलेल्या अर्जाप्रमाणे करणे बंधनकारक राहील. अन्यथा अर्ज बाद केले जातील.

९) अपुर्ण माहिती व अटींची पुर्तता न करणा-या उमेदवाराचे अर्ज बाद करून अपात्र ठरविले जातील. अपात्र अर्ज कार्यालयात जमा करणेत येतील. याबाबत कोणत्याही प्रकारचा पत्रव्यवहार केला जाणार नाही.

१०) सदरची निवड ही सहा. शिक्षक व पदवीधर शिक्षक पदासाठी केवळ तात्पुरत्या एकत्रित मानधनावर हंगामी स्वरूपाची आहे. उमेदवारास मनपा सेवेत राहण्याचा अधिकार मागता येणार नाही. सदरचे पद हे शैक्षणिक वर्ष – २०२२-२०२३ या करीता व आवश्यकतेनुसार राहील.

११) तसेच पवित्र प्रणाली मार्फत शिक्षक उपलब्ध झाल्यास एकत्रित मानधनावरील नियुक्त्या रद्द करण्याचे अधिकार मा. अति.आयुक्त(१) सो.पिं.चिं.मनपा यांचा राहील.

१२) नियुक्तीच्या वेळी उमेदवारास रक्कम रूपये १००/- स्टॅम्प पेपरवर (नोटराईज्ड करून) मनपा सेवेत भविष्यात नोकरी बाबतचा कोणताही हक्क राहणार नाही. तसेच न्यायालयात दाद मागणार नाही. याबाबतचे हमीपत्र सादर करणे बंधनकारक आहे.

सदरची जाहीरात व अर्जाचा नमुना महापालिकेच्या www.pcmcindia.gov.in या संकेत स्थळावर पाहता येईल.जाहिरातीनुसार कार्यवाही करणे अथवा प्रक्रिया कोणत्याही स्तरावर रद्द करण्याचा अंतिम निर्णय मा. अति.आयुक्त(१) सो.पिं.चिं.मनपा यांचा राहील.

(प्रदीप जांभळे-पाटील)
**मा.अति.आयुक्त(१)**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका.
पिंपरी पुणे – १८.

**ऊमेदवाराने करावयाचा अर्जाचा नमुना**
**मराठी/ऊर्दु / हिंदी / इंग्रजी**

| पासपोर्ट आकाराचा फोटो |
|---|

प्रति,

**मा. अतिरिक्त आयुक्त ,(१)**
प्राथमिक शिक्षण विभाग,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी पुणे – १८ .

**विषय – सन २०२२ – २०२३ या शैक्षणिक वर्षाकरीता** एकत्रित **तात्पुरत्या स्वरुपात एकत्रित मानधनावर नेमणूकीबाबत.**

संदर्भ – जाहीरात क्र. ३२५ दि.३० /११/२०२२ प्रसिध्द झालेली जाहिरात.

महोदय,

संदर्भिय जाहिरातीनुसार मी एकत्रित मानधनावर तात्पुरत्या स्वरुपात खालील नमुद पदांकरीता आवश्यक ती अर्हता धारण करीत असून सदरच्या पदासाठी निवड होण्याकरिता विहित नमुन्यातील अर्ज पुढीलप्रमाणे सादर करीत आहे.

१) माध्यम : ☐ (मराठी/ ऊर्दु / हिंदी / इंग्रजी )

२) ज्या पदासाठी अर्ज करावयाचा आहे ते पद : ☐ ( सहा.शिक्षक/पदवीधर)

३) पदवीधर पदासाठी अर्ज असल्यास पदवीचा विषय ☐ (विज्ञान /भाषा/ समाजशास्त्र)

४) संपूर्ण नाव : ☐ (आडनाव) ☐ ( स्वत:चे नाव ) ☐ ( वडिलांचे/पतीचे नाव )

५) पत्रव्यवहाराचा पत्ता : ______________________________

______________________________ पिनकोड :

६) मोबाइल नंबर : ☐ ई-मेल आय डी: ☐

७) जन्मतारीख : (दिनांक / महिना / वर्ष) (......./......./१९......) वय : .......वर्षे ..... महिने.

८) लिंग : स्त्री ☐ / पुरुष ☐

९) जात : .................................... प्रवर्ग : ...............................(उदा.अ.जा./अ.ज./खुला,)

१०) ज्या पदासाठी अर्ज केला आहे त्या पदासाठीची जाहिरातीनुसार धारण केलेली शैक्षणिक अर्हता :

| अ.क्र | शैक्षणिक अर्हता | पदवीचा विषय | उत्तीर्ण वर्ष | एकुण गुण | प्राप्त गुण | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | एच.एस.सी. | | | | | |
| २ | डी.एड. | | | | | |
| ३ | बी.ए. | | | | | |
| ४ | बी.एड. | | | | | |
| ५ | बी.एस.सी. | | | | | |
| ६ | अनुभव प्रमाणपत्र | होय/नाही. सोबत प्रमाणपत्राची सत्यप्रत आवश्यक आहे. | | | | |

- पर्सेंटाईल गुण असणाऱ्या उमेदवारींनी संबंधित विद्यापीठ शेकडा गुणांची प्रमाणित प्रत जोडावी.सदर प्रत नसेल तर अर्ज बाद केला जाईल.
- शैक्षणिक अर्हतेत चुकीचा पर्याय खोडावा.

मी खाली सही करणार प्रमाणित करते/ करतो की, वर नमूद केलेला तपशील खरा व बरोबर असून त्याबाबत आवश्यक प्रमाणपत्रांच्या प्रमाणित प्रती सोबत जोडत आहे. तसेच वर दिलेली माहिती खोटी अगर चुकीची आढळून आल्यास या माहितीच्या आधारे सदरची नियुक्ती तात्काळ रद्द होण्यास मी पात्र राहील. तसेच माझ्याविरुध्द कायदेशीर कारवाई केल्यास माझी कोणतीही तक्रार राहणार नाही.

(आपला/आपली विश्वासू )

स्थळ –

अर्जदाराची सही________________________

दिनांक - /-----/२०२२

अर्जदाराचे नाव________________________

सोबत सहपत्रे– अर्जासोबत शैक्षणिक अर्हतेनुसार प्रमाणपत्रांच्या प्रमाणित सत्यप्रती सोबत जोडत आहे.

१) ☐ २) ☐ ३) ☐ ४) ☐ ५) ☐ ६) ☐

टिप:- आवश्यक कागदपत्रा व्यतिरिक्त अनावश्यक कागदपत्रे जोडू नये.